## रे.क.न. १८८/२०१७ मधील निशाणी क्रमांक ९८ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई करीता दाखल केला आहे.

०२. दावा मिळकतीत वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्रं. १ व २ अगर त्यांचेतर्फे कोणत्याही इसमाने हरकत अडथळा करु नये, त्यावर बोजा अथवा त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करु नये अगर दावा मिळकत अन्य मार्गाने तबदिल करु नये असा प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त मनाई आदेश पारित व्हावा अशी विनंती उक्त अर्जान्वये केली आहे. सदर अर्जास प्रतिवादी क्रं.१ व २ यांनी नि. १०२ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

०३. **दावा मिळकतीचे वर्णन** –

**अ)**–मौजे काटेभोगाव ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील खालील वर्णनाची शेतमिळकत–

| अ.क्रं. | गट नंबर | क्षेत्र<br>हे. आर. | आकार<br>रुपये पैसे | पैकी क्षेत्र<br>हे. आर. |
|---|---|---|---|---|
| १.अ | २८४<br>जुना सर्व्हे<br>नं. ७१ | ३ एकर ५७<br>आर | ३.२५ | १/६ |

ब)– कळे ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकती–

| अ.क्रं. | गट नंबर | क्षेत्र<br>हे. आर. | आकार<br>रुपये पैसे | पैकी क्षेत्र<br>हे. आर. |
|---|---|---|---|---|
| १–ब. | ५९ जुना सर्व्हे<br>नं.२००/२ | ०–२९.३ | ३–७५ | १/६ |
| १–क. | ४५७ जुना<br>सर्व्हे नं.<br>४९०/५ | ०–२१ | २–८१ | १/६ |
| १–ड. | ६८६ जुना<br>सर्व्हे<br>नं.४७८/१ | ०–२६.३ | ४–६९ | १/६ |
| १–इ. | ३३५ जुना<br>सर्व्हे<br>नं.३५२/०,<br>३५४/२ | ०–०.२ | १०–५० | १/६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १-ई. | २३३ | ०-०८.१० | ०१-३७ | १/३ |
| १-प. | २३७ | ०-०३.०० | ०-४७ | १/३ |
| १-फ. | ६६८ | ०-०४.०० | ०-६२ | १/३ |
| १-भ. | ६७० | ०-१४.२० | २-०९ | १/३ |
| १-म. | ७०७ | ०-०६.१० | ०१-०० | १/३ |
| १-त. | ८९९ | १-९८.३० | १९-६९ | १/३ |

''येणे प्रमाणे शेत मिळकती असे''

२)- कळे ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील खालील वर्णनाच्या घर मिळकती-

| अ.क्रं. | गट नंबर | चौ.मिटर | आकार रुपये पैसे | पैकी क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|
| २-अ | सि.स.नं.१४६ | ३६.९ | - | १/३ |
| २-ब | सि.स.नं.१६३ | १८२.७ | - | १/३ |
| २-क | सि.स.नं.१४३ | ९७.५ | - | १/३ |

वर कलम १-अ ते १-त मध्ये नमुद केले शेत मिळकती व दावा कलम २-अ ते २-क या घर मिळकती सदर दावेचा वाद विषय असनु त्यास येथुन पुढे संक्षीप्तपणे ''दावा मिळकती'' अस संबोधणेत येते.

## **<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** -

०४. वादी यांनी वर नमूद केलेल्या शेतमिळकती व घर मिळकती वादी यांचे मयत पती रंगराव यांचे पूर्वहक्कदार राघू बाबाजी देसाई यांच्या मालकी कब्जा वहिवाटीच्या मिळकती होत्या. राघू देसाई हे सन १९४५ साली मयत झाले आहेत. सदर मयतास वादी व प्रतिवादी हे सरळ कायदेशीर वारस आहेत. सदर मयतांची वंशावळ अर्जात नमुद केली आहे.

०५. वादी ही मयत रंगराव देसाई यांची पत्नी आहे. प्रतिवादी क्रं. १ व २ हे वादीचे पुतणे आहेत. प्रतिवादी क्रं.३ हा वादीचा दिर आहे. प्रतिवादी क्रं. ४ व ५ वादीच्या नणंदा आहेत तसेच प्रतिवादी क्रं. ६ ते ९ हे वादीचे चुलत दिर दादासो यांची मुले आहेत व तसेच प्रतिवादी क्रं. १५ यांनी दावा मिळकती घर मिळकत तथाकथीत दस्ताने खरेदी घेतली आहे व प्रतिवादी क्रं. १६ ते २२ हे मयत चुलते ज्ञानू राघू देसाई यांचे वारस आहेत. या व्यतिरिक्त दाव्यास अन्य कोणतेही वारस नाहीत.

०६. वर कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकती या मुळच्या राघू बाबाजी देसाई यांच्या मालकी कब्जा वहिवाटीच्या आहेत, राघू हे सन १९४५ साली मयत झाले आहेत. त्यांना धोंडी, तुकाराम, ज्ञानू हे सरळ व कायदेशीर वारस आहेत. धोंडी हे सन १९५७ साली मयत झाले आहेत तसेच तुकाराम

व ज्ञानू हे देखील मयत झाले आहे. त्यांना वादी व प्रतिवादी हे सरळ व कायदेशीर वारस आहेत. वर कलम १ मध्ये नमूद मिळकती वादी यांचे पूर्वहक्कदार मयत पती रंगराव धोंडी देसाई यांच्या व त्यांचे भाऊ आनंदा व बळवंत यांच्या समाईक मालकी व कब्जा वहिवाटीत होत्या व आजदेखील आहेत. मयत धोंडी सन १९५७ साली मयत झाले नंतर दावा मिळकतीच्या कागदोपत्री मयत आनंदा, मयत रंगराव व बळवंत देसाई यांच्या नावाच्या नोंद झाली. दावा मिळकती या वादी यांचे पूर्वहक्कदार व त्यांचे भाऊ हे समाईकात कसत होते. प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार आनंदा देसाई हे २००२ साली मयत झाले आहेत.

**०७.** आनंदा हे ग्रामसेवक म्हणून नोकरीस होते त्याचा गैरफायदा घेवून वर कलम १ मध्ये नमूद केलेल्या दावा मिळकतीच्या कागदोपत्री वादी यांचे पूर्वहक्कदार यांना अंधारात ठेवून दावा मिळकतीच्या कागदोपत्री ए.कु.पु. म्हणून नोंद करुन घेतली होती. सदर नोंदीच्या अधारे वादी यांचे पूर्वहक्कदार यांचे संमतीशिवाय कलम १ मध्ये नमूद केलेली १–अ या मिळकतीस स्वतःच्या नावाची नोंद करुन घेतली आहे. १–ब ही शेतमिळकत वादी यांचे पूर्वहक्कदार यांना खाणेसाठी दिली आहे. दावा मिळकत १–क ही शेतमिळकत प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार आनंदा धोंडी देसाई यांनी ए.कु.पु.

असलेचा गैरफायदा घेऊन वादी यांचे संमती शिवाय प्रतिवादी नं. ६ ते १५ यांचे पूर्वहक्कदारांचे नांवे तथाकथित, नाममात्र, बिनभरण्याचे पोकळ खरेदीपत्र करून दिले आहे. तसेच दावा मिळकत 'ड' मध्ये नमूद केलेली शेत मिळकत ही वादी यांचे पूर्वहक्कदारांचे समंती शिवाय प्रतिवादी क्रं. ६ ते ९ व १० ते १३ यांचे पूर्वहक्कदार दादासो यांचे नांवे प्रतिवादी क्रं. १ व २ यांची पूर्वहक्कदार ए.कु.पु. असलेचा गैरफायदा घेवून तथकथित, बिनभरण्याचे, पोकळ दस्त करुन दिलेचे वादी यांना समजून आले व दावा कलम १–इ मधील शेतमिळकत प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार यांनी विद्युत कनेकक्शनसाठी परवाना लागत असलेने वादी यांच्या पूर्वहक्कदारांच्या नांवे करुन दिली आहे. वर नमूद केलेल्या मिळकतीच्या अद्यापी सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार यांनी महसूल खातेशी संगनमत करुन वादी यांचे पूर्वहक्कदार अशिक्षित व अडाणी असलेचा गैरफायदा घेवून तथाकथित बिनभरणाचे पोकळ दस्त केलेचे वादी यांचे पूर्वहक्कदार मयत झालेनंतर समजून आले आहे.

०८. दावा कलम १–अ ही मिळकत गवती पड असून सदर मिळकतीमध्ये वादी हे त्यांचे पूर्वहक्कदारांपासून सालोसाल गवत कापत होते व

आजही कापत आहेत. असे असताना प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी वादी यांना त्यांचे वकीलामार्फत नोटीस देवून दावा मिळकतीचा तुमचा काही संबंध नसल्याचे कळविले. त्यावेळी वादी यांनी दावा मिळकती संबंधी सर्व कागदपत्रे काढून पाहिली असता प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार यांनी महसूल खात्याशी हातमिळवणी करुन ए.कु.प. असलेचा गैरफायदा घेवून बोगस दस्त केल्याचे समजून आले. त्यानंतर वादी यांनी त्यांचे वकीलामार्फत दावा कलम १–अ मधील गवती पड बाबत नोटीस पाठवून दावा मिळकत तुमच्या एकटयाची नसून ती धोंडी, तुकाराम, ज्ञानू, राघू देसाई मालकी समाईकातील कब्जावहिवाटीची असल्यामुळे सदर मिळकतीशी तुमचा एकटयाचा काही संबंध नाही अशा आशयाची नोटीस दि. १३.१२.२०१२ रोजी पाठवली. सदर मिळकत ही समाईकात कब्जा वहिवाटीत आहे.

**०९.** असे असतानाही प्रतिवादी क्रं. १ व २ दांडगाव्याने वादी यांच्या कब्जा वहिवाटीस हरकत करुन गवत कापणेस हरकत व अडथळा करु लागले आहेत. दावा मिळकतीच्या अद्याप सरस निरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत. वादी यांचे पूर्वहक्कदारांच्या संमती शिवाय प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार यांनी ए.कु.पु असलेचा गैरफायदा घेवून केलेला दस्त वादीच्या हिस्सेवर बंधनकारक नाही.

१०. दावा कलम २–अ व ब या घर मिळकती देखील वादी यांचे पूर्वहक्दाराचे संमती शिवाय प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार यांचे नावे असलेल्या ए.कु.पु. असलेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार मयत झालेनंतर बेकायदेशीररित्या दावा मिळकतीस वारसा हक्काने त्यांचे नावाची नोंद करुन घेऊन दावा कलम १ मधील २–अ ही घर मिळकत वादी यांचे पूर्वहक्कदार यांचे संमतीशिवाय सदर मिळकत प्रतिवादी यांनी चुलत सासरे मयत तुकाराम राघू देसाई यांचे नांवे तथाकथित दस्त केलेचे वादी यांना समजून आले व तसेच दावा कलम १–२–ब ही मिळकत नाममात्र असलेचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्रं. १२ यांचे नांवे दस्त केलेचे समजून आले आहे. दावा अर्जी कलम १–२ मध्ये नमूद केलेल्या घर मिळकतीच्या वादी व प्रतिवादी यांचे सरस निरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी करुन दिलेला दस्त वादीच्या हिस्सेवर बंधनकारक नाही.

११. दावा अर्जी कलम १ मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण मिळकतीच्या वादी व प्रतिवादी मयत आनंदा व बळवंत यांच्या मध्ये सरस निरस मानाने वाटण्या झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार यांना दावा कलम ६ व ७ यामध्ये नमूद केले प्रमाणे कोणत्याही स्वरुपाचे

दस्ताने प्रतिवादी क्रं. ६ ते १५ यांना कसलेही मालकी हक्क प्राप्त होत नाहीत. त्यामुळे दावा अर्जी कलम १ मध्ये नमूद शेतमिळकती १/६ हिस्सा तुटक होऊन वादी यांचे कब्जे मिळणेकरीता दावा अर्जी कलम १–२ मध्ये नमूद घर मिळकती १/३ हिस्सा तुटक होऊन मिळणेकरीता वादी यांना सदरचा दावा दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्रं. ६ ते १२ यांना कोणतेही कायदेशीर मालकी हक्क प्राप्त होत नाहीत असे हक्कज्ञापन होऊन मिळणेकरीता वादी यांनी सदरचा दावा दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी दावा अर्जी कलम १ मध्ये असलेल्या गवत कापणीसाठी हरकत व अडथळा करु नये म्हणून कायम मनाई ताकीद होणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**१२.** प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.१०२ वर दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, मौजे काटेभोगांव ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील गट नं. २८४ क्षेत्र हे.३–५७ आर. या मिळकतीमध्ये वादींना काहीही हिस्सा नाही. सदरची मिळकत आनंदा, रंगराव व बळवंत या भावांचे दरम्यान झाले तोंडी वाटपाने संपूर्ण हिस्सा आनंदा यांना देणेत आला असून तिचेशी रंगराव व बळवंत यांचा काहीही संबंध नव्हता व नाही. पुढे ती आनंदा यांनी त्यावेळेचे बाजरभावाने कुळ हक्काने मुळ मालक यांना खरेदीची किंमत देऊन ती त्यांनी त्याचे नांवे खरेदी करुन घेतली आहे व

ती स्वकष्टार्जीत मिळकत आहे. तिचे मालकी कब्जा अगर वहिवाटीशी वादी अथवा अन्य कोणाचाही संबंध नाही.

१३. गट नं. ५९ ही वडीलार्जीत जमिन असून ती प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे वडील आनंदा यांचे नांवे होती व ती दि.२०–०१–२००१ चे वर्दी अर्ज देऊन ७/१२ पत्रकी डायरी नं.३११५ प्रमाणे अदलाबदलाप्रमाणे रंगराव यांना देणेत आली आहे. त्यास वादीची संमती आहे. तसेच गट नं. ४५७ व गट नं. ६८६ या दोन्ही जमिनी आनंदा, रंगराव व बळवंत या भावानी एकमेकांचे विचाराने विक्री करुन त्या रक्कमेतून मरळी येथील गट नं. ३५६ 'आंबवडा' नावाची जमिन समाईकात रंगराव यांचे नावे खरेदी केली आहे. तोंडी वाटपाप्रमाणे गट नं. ४५७ व ६८६ या दोन्ही जमिनी आनंदाच्या मालकीच्या होत्या. गट नं. ४५७ ही वडिलार्जीत असून गट नं. ६८६ ही त्यांना आजीकडून मिळालेली मिळकत आहे. वादी यांनी मुद्दामपणे मरळी येथील जमिनीचा दावेत उल्लेख केलेला नाही व ती जमिन रंगराव याचे नांवे असलेचा गैरफायदा घेऊन गीळंकृत करणेचा प्रयत्न चालवला आहे. सदर जमीनीचे खरेदीपत्र दुय्यम निबंधक येथे अ.नं.१४६८/१९९३ व १८०१/२००० ला नोंद आहे.

**१४.** गट नं. ३३५ मळी सदरची मिळकत आणेवारीप्रमाणे तिघा भावांचे नांवे प्रत्येकी १० गुंठे नोंद झाली असून त्यांचे पश्चात ती त्यांचे वारसांचे नांवे आहे व त्याप्रमाणे कब्जा वहिवाट आहे. सदरची मिळकत ही वडिलार्जीत आहे. सदर मिळकतीपैकी आनंदाचे वारसांनी व बळवंतने त्यांचे क्षेत्र विक्री केले असून रंगरावचे वारसांचे क्षेत्र फक्त त्यांचे त्यांना शिल्लक आहे. वादी यांनी सदर गट नंबरचे क्षेत्र चुकीचे लिहिले आहे.

**१५.** गट नं. २३३ मधील पूर्ण हिस्सा बळवंत यांना दिला असून तो त्यांनी विक्री केला आहे. गट नं. २३७ चे संपूर्ण क्षेत्र आनंदाचे वाटणीस दिले आहे. गट नं. ६६८ चे संपूर्ण क्षेत्र बळवंतचे वाटणीस दिले असून ते त्यांनी विक्री केले आहे. गट नं. ७६० मधील ९ गुंठे क्षेत्र रंगराव यास व ५ गुंठे क्षेत्र बळवंत यास दिले असून बळवंत यांनी त्यांचे क्षेत्र विक्री केले आहे. गट नं. ७०७ मधील ४ गुंठे क्षेत्र रंगराव व ४ गुंठे बळवंत यास दिले असून बळवंतने त्यांचे क्षेत्र विक्री केले आहे. गट नं. ८९९ हा तिघांमध्ये समान हिस्सेने वाटप करुन ज्याचे त्याला क्षेत्र स्वतंत्र आहे.

**१६.** सि.स.नं.१४६ व १६३ या मिळकती आनंदा, रंगराव व बळवंत या तिघा भावांच्यात झाले तोंडी वाटपाप्रमाणे सुतार गल्ली येथील घर रंगराव व

बळवंत यांना प्रत्येकी १/२ हिस्सेने व आनंदा यांना राहिलेली संपूर्ण पडसर जागा देणेत आली. त्यानंतर रंगराव यांनी सुतार गल्लीमधील घरातील त्याचा १/२ हिस्सा बळवंत यांना विक्री केला. अशा प्रकारे सुतार गल्लीमधील संपूर्ण घर बळवंत यांचे मालकीचे आहे. पडसर जागा आनंदा यांचे मालकीची झाली व आनंदाचे पश्चात ती आता प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे मालकीची आहे. अशा प्रकारे मिळकत क्रं. २('अ' व 'ब') या मिळकतीचे मालकी कब्जा अगर वहिवाटीशी वादी यांचा काहीही हक्क अगर संबंध शिल्लक राहिला नाही. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी त्यांचे मालकीची पडसर जागा विक्री केली आहे. सि.स.नं.१६३ ची मिळकत अशोक राजाराम पाटील यांना व सि.स.नं. १४६ तुकाराम राघू देसाई यांना विक्री केली असून त्या खरेदीपत्रावर वादीचे वडीलांची सही आहे.

**१७.** वरील प्रमाणे पूर्वीच वाटप होऊन ज्याचे त्याला हिस्से स्वतंत्र आहेत व आपआपले क्षेत्रामध्ये कष्ट मशागत करुन पिके घेतात. सर्व मिळकतीमध्ये वादीचा १/३ हिस्सा कधीही नव्हता व नाही व पूर्वीच वाटप झालेने आता परत वाटप करुन मागणेचा प्रश्न येत नाही. सदर मिळकतीपैकी गट नं. ६६८ बळवंत धोंडी देसाई यांचे वाटणीस असलेने ती त्यांनी हिंदूराव देसाई यांना विक्री केली आहे. तसेच गट नं. २३३ ही बळवंत देसाई यांचे

वाटणीस असलेने ती मिळकत देखील त्यांनी विक्री केली आहे व गट नं. ८९९ हाच फक्त तिघांच्यामध्ये सरस निरस मानाने वाटप होऊन ज्याचे त्याला हिस्से स्वतंत्र आहे. परंतु वादीने हद्दी दरम्यानचे बांध मोडून प्रतिवादी यांचे क्षेत्रात अतिक्रमण करणेस सुरुवात केली आहे व याच सदर गट नंबरमध्ये जादा क्षेत्र आहे. म्हणून प्रतिवादी यांनी मोजणीबाबत विचारणा केली असता तो मोजणी करुन देणेस तयार नाही व अरेरावी करुन प्रतिवादी यांचे क्षेत्रात अतिक्रमण केले आहे. तसेच सदर गट नंबर मध्ये पाण्याची समाईक विहिर असून त्याचा वापर वादी एकटा दांडगाव्याने करतो. तसेच विहिरी भोवती अंदाजे ५ गुंठे क्षेत्र समाईक असून त्याचाही वापर वादीच करतो. याप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

१८. कळे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील सि.स.नं.१४६(ब) सि.स.नं.१६३(क) सि.स.नं.१४३ या तिन मिळकती पैकी सि.स.नं. १४३ दगट विटाचे घर वादीचे वडील रंगराव धोंडी देसाई, चुलते बळवंत धोंडी देसाई या दोघांना दिली व त्या घर व घर जागेचे बदली सि.स.नं.१४६ व सि.स.नं १६३ या दोन पडसर जागा प्रतिवादी यांचे वडील आनंदराव धोंडीराम देसाई यांना दिल्या व त्याप्रमाणे त्यांची स्वतंत्र वहिवाटी आहे. अशा प्रकारे सर्व मिळकतीचे पूर्वीच सरस निरस मानाने वाटप झाले असल्याने आता फेरवाटपाचा प्रश्न उद्भवत नाही. सि.स.नं. १४६ मधील पडसर जागा

प्रतिवादी नं. १ व २ यांना विक्री केल्या असून ती खरेदीपत्र सर्वांच्या सहीची नावे असलेने करुन दिली आहे व सि.स.नं.१६३ ची मिळकत प्रतिवादी क्रं. १ व २ व त्यांचे आईचे सहीने त्यांनी विक्री केली आहे. सि.स.नं.१४६ सदरची मिळकत तुकाराम राघू देसाई यांना प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी विक्री केली असून त्या खरेदीपत्रावर वादीचे वडीलांची सही आहे व १६३ अशोक राजाराम पाटील यांना विक्री केली आहे.

**१९.** वादी यांनी उल्लेख केलेल्या सर्व मिळकतीचे वादीचे वडीलांचे हयातीत सरस निरस मानाने तोंडी वाटप होऊन त्याप्रमाणे ज्याची त्याला स्वतंत्र कब्जा वहिवाट आहे. त्याबाबत वादीच्या वडीलांची कधीही तक्रार नव्हती. सदर जमिनीपैकी प्रतिवादीचे वाटणीस आलेले जमिनीपैकी बरेचसे क्षेत्र त्यांनी विक्री केले आहे व ती विक्री फेरफार क्रं. ३१९५ होणेचे अगोदर झाली आहे. ते व्यवहार वाटणीप्रमाणे आलेल्या जमिनी पैकी व्यवहार झाल आहेत. विक्रीचे वेळी वादीचे वडीलांची कोणत्याही प्रकारे हरकत नव्हती. वादी व प्रतिवादी यांचे पूर्व हक्कदार यांचे दरम्यान जे तोंडी वाटणीपत्र झाले ते खालील प्रमाणे

| अ.क्र. | गट नंबर | आनंदा | रंगराव | बळवंत |
|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र हे.– आर. | क्षेत्र हे.– आर. | क्षेत्र हे.– आर. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | २२३ | ०–०३ | ०–०३ | ०–०३ |
| २. | २२५ | ०–०४.८ | ०–०२.४ | – |
| ३. | २३७ | ०–०३.० | – | – |
| ४. | ६८६ | ०–०८.० | – | – |
| ५. | ४५७ | ०–०७.० | – | – |
| ६. | ५९ | ०–०३.० | ०–०३ | ०–०३ |
| ७. | ३३५ | ०–१०.०० | ०–१०.० | ०–१०.० |
| ८. | ३३० (मरळी) | ०–०३.० | ०–१४.८ | ०–०३.०० |
| ९. | २३१ | – | ०–०४.० | – |
| १०. | ७०७ | – | ०–०४.० | ०–०४.० |
| ११. | ६७० | – | ०–०९ | ०–०५.० |
| १२. | २३३ | – | – | ०–०८.१० |
| १३. | ६६८ | – | – | ०–०४ |
| १४. | ८९९ | तिघांना समान हिस्सा आहे. | | |

**२०.** वरील प्रमाणे तांडी वाटणीपत्राचा तपशील असून त्याप्रमाणे कागदोपत्री नोंदी झाल्या आहेत. तसेच कोणतेही प्रकारे क्षेत्रामध्ये बदल नाही. झालेला फेरफार हा सर्वांचे संमतीने व झाले वाटणीपत्राप्रमाणे झाला आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे परत वाटप करणेची आवश्यकता नाही.

**२१.** दावा मिळकतीचे पूर्वीच सरस निरस मानाने तोंडी वाटप झालेने वादी यांना प्रतिवादी विरुध्द खरेदी, विक्री, बांधकाम करणेबाबत मनाई सारखी दाद मागणेचा कांहीही अधिकार नाही. प्रतिवादी यांच्या ताब्यात असतानाच्या सर्व मिळकती या त्यांचे खुद्द मालकी व कब्जे वहिवाटीच्या असून त्या मिळकतीशी मालकी, कब्जा अगर वहिवाटीचा वादीचा कांहीही संबंध नाही. त्यामुळे त्यांना प्रतिवादी विरुध् मनाई सारखी दाद मागणता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**२२.** दोन्ही बाजूंच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूंचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | होय. |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**२३.** वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ४, १४, ४२, १४४,१०४,१४७,१५१ व १६० सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | मौजे काटे भोगाव, ता.पन्हाळा येथील गट क्रं. २८४ चा ७/१२ उतारा | ०६.१२.२०१३ | स.शि.नक्कल |
| २. | कळे, ता.पन्हाळा येथील गट नं. ५९ चा सातबारा उतारा. | ०४.१२.२०१३ | स.शि.नक्कल |
| ३. | कळे, ता.पन्हाळा येथील गट नं. ४५७ चा सातबारा उतारा. | ०४.१२.२०१३ | स.शि.नक्कल |
| ४. | कळे, ता.पन्हाळा येथील गट नं. ६८६ चा सातबारा उतारा. | ०४.१२.२०१३ | स.शि.नक्कल |
| ५. | कळे, ता.पन्हाळा येथील गट नं. ३३५ चा सातबारा उतारा. | ०४.१२.२०१३ | स.शि.नक्कल |
| ६. | कळे, ता.पन्हाळा, येथीलस सि.स.नं. १४६ चा मिळकतीचे प्रॉपर्टी कार्डाचा उतारा | ०३.१२.२०१३ | स.शि.नक्कल |
| ७. | कळे, ता.पन्हाळा, येथीलस सि.स.नं. १६३ चा मिळकतीचे | ०६.११.२०१३ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रॉपर्टी कार्डाचा उतारा | | |
| ८. | प्रतिवादी यांनी वादी यांना वकीलांचे मार्फत पाठविलेली नोटीसीची प्रत | १०.११.२०१२ | अस्सल |
| ९. | वादी यांनी प्रतिवादी यांच्या नोटीसीस वकीलांचे मार्फत पाठविलेले उत्तर | १३.१२.२०११ | स्थळप्रत |
| १०. | वि.प.नं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार धोंडी राघू देसाई यांच्या नावचा ए.कु.पु. असलेचा फेरफार क्रं. ९५९१ चा उतारा. | ३१.१२.२०१४ | स.शि.नक्कल |
| ११. | धोंडी रामू देसाई यांच्या नावे वाद मिळकती बाबत चालेविलेल्या कुळ कायद्याच्या कामाची नोटीसीची प्रत | – | झेरॉक्स |
| १२. | सन २०१२–२०१३ या साली वादी यांनी दावा मिळकती मधील गवत कापत असतानाचा फोटो | – | – |
| १२. | दावा मिळकतीमधील गवताचा भारा (बिंडा) बांधत असतानाचा फोटो. | – | – |
| १३. | दावा मिळकतीमध्ये गवत कापत असताना. | – | – |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | वादी यांनी कोडॅक रोल खरेदी केलेले बील | २०.१२.२०१३ | अस्सल |
| १५. | फोटो डेव्हलपिंक केलेबाबतचे फोटोचे बील | २१.१२.२०१३ | अस्सल |
| १६. | फोटो डेव्हलपिंक केलेबाबतचे फोटोचे बील | २१.१२.२०१३ | अस्सल |
| १७. | धोंडी राघू देसाई याना कुळ कायदयाची आलेली नोटीस | २८.०८.१९८८ | अस्सल |
| १८. | धोंडी राघू देसाई याना कुळ कायदयाची आलेली नोटीस | ०५.०१.१९८८ | अस्सल |
| १९. | धोंडी राघू देसाई याना कुळ कायदयाची आलेली नोटीस | २९.०८.१९८८ | झेरॉक्स |
| २०. | प्रस्तुत कामातील आनंदा धोंडी याचा जबाब | १९.०१.१९८८ | स.शि.नक्कल |
| २१. | सदाशिव आनंदा शिरोळकर यांचा जबाब | १८.०१.१९८८ | स.शि.नक्कल |
| २२. | धोंडी राघू देसाई यांच्या नावचे सेल सर्टीफिकेट | २३.१२.१९८९ | स.शि.नक्कल |
| २३. | धोंडी राघू देसाई यांच्या नावचा आदेश | २३.१२.१९८९ | स.शि.नक्कल |
| २४. | सदर हुकुमाप्रमाणे झालेली डायरी | ०६.०६.२०११ | स.शि.नक्कल |
| २५. | धोडी राहू व जमीन मालक | ०५.०१.२०१३ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| | यांच्यामध्ये कुळ असलेबाबतचा फेरफार १५२६ | | |
| २६. | गट नं. २८४ चा ७/१२ उतारा | २६.११.२०१२ | स.शि.नक्कल |
| २७. | स.नं. ७१ चा ७/१२ उतारा सन १९५८ ते १९९५ चा उतारा | १६.०६.२०११ | स.शि.नक्कल |
| २८. | कि.दि. अपिल नं. ४८/२०१५ मधील न्यायनिर्णय प्रत | २५.०९.२०१९ | झेरॉक्स |
| २९. | दस्त नं. ५७६/१९८५ चे खरेदीपत्र | १४.०५.१९८६ | झेरॉक्स |
| ३०. | प्रतिवादी क्रं. ३–ब यांचा मृत्युदाखला | २८.०६.२०२२ | स.शि.नक्कल |
| ३१. | रजि. दस्त नं. ३८३ चे कथीत खरेदीपत्र | १७.१०.१९९७ | स.शि.नक्कल |
| ३२ | रजि. दस्त नं. १७४८ चे कथीत खरेदीपत्र | ०३.०७.२००१ | स.शि.नक्कल |
| ३३. | रजि. दस्त नं. १७४९ चे कथीत खरेदीपत्र | ०३.०७.२००१ | स.शि.नक्कल |
| ३४. | रजि. दस्त नं. १७५० चे कथीत खरेदीपत्र | ०३.०७.२००१ | स.शि.नक्कल |
| ३५. | रजि. दस्त नं. १७५१ चे कथीत खरेदीपत्र | ०३.०७.२००१ | स.शि.नक्कल |
| ३६. | रजि. दस्त नं. ३४५ चे कथीत | ०४.०२.२०१६ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| | खरेदीपत्र | | |
| ३७. | रजि. दस्त नं. २२३९ चे खरेदीपुर्व खरेदीपत्र | २८.०८.२०१८ | स.शि.नक्कल |
| ३८. | गट क्रं. २३३ चा सातबारा उतारा. | २२.१०.२०२० | स.शि.नक्कल |
| ३९. | गट क्रं. २३७ चा सातबारा उतारा. | २२.१०.२०२० | स.शि.नक्कल |
| ४०. | गट क्रं. ६६८ चा सातबारा उतारा. | २२.१०.२०२० | स.शि.नक्कल |
| ४१. | गट क्रं. ६७० चा सातबारा उतारा. | २२.१०.२०२० | स.शि.नक्कल |
| ४२. | गट क्रं. ७०७ चा सातबारा उतारा. | २२.१०.२०२० | स.शि.नक्कल |
| ४३. | गट क्रं. ८९९ चा सातबारा उतारा. | २२.१०.२०२० | स.शि.नक्कल |
| ४४. | प्रतिवादी दावा मिळकतीतून रस्ता करत असलेबाबत फोटो (एकूण ५ फोटो) | ०८.०१.२०२४ | फोटो |
| ४५. | सदर फोटोचे बील | ०८.०१.२०२४ | मुळ |

**२४.** प्रतिवादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ४४,४४–अ, ४६,११४ व १२३ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | दावा गट नं. २८४ ची मिळकत प्रतिवादीचे वडील यांनी ३२–ग अन्वये खरेदी केली असल्याबाबतची डायरी नं. ७२२ चा उतारा | १३.१२.२०१४ | स.शि.नक्कल |
| २. | दावा गट नं. २८४ चा सातबारा उतारा. | १३.१२.२०१२ | स.शि.नक्कल |
| ३. | दावा गट नं. २८४ ची जमिन प्रतिवादीचे वडील यांचे एकटयाचे नावावर असल्याबाबतचा ८–अ उतारा | १३.१२.२०१२ | झेरॉक्स |
| ४. | वारसा डायरी नं. ३१८७ चा उतारा. | ०५.०६.२००७ | झेरॉक्स |
| ५. | वादीनी प्रतिवादी नं. १ व २यांचे विरुध्द दाखल केलेला रे.क.नं.२२७/२०१२ नि.क्रं. १ ची प्रत. | १३.१२.२०१२ | झेरॉक्स |
| ६. | मरळी येथील खाते नं. ३०५ चा ८–अ चा उतारा | ०१.०३.२०१४ | स.शि.नक्कल |
| ७. | कळे येथील गट नं. ५४१ चा ७/१२ उतारा | ०१.०३.२०१४ | स.शि.नक्कल |
| ८. | तुकाराम राघु देसाई यांना खरेदी | ३०.०७.२०१३ | अस्सल |

| | | | |
|---|---|---|---|
| | दिले दस्ताची अ.नं. २०६७/०३ ची मुळ प्रत | | |
| ९. | आनंदराव धोंडी देसाई व रंगराव धोंडी देसाई यांचेमध्ये झाले अदलाबद्दल दस्त | २०.०१.२००१ | झेरॉक्स |
| १०. | कळे येथील खाते नं. २४ चा ८–अ चा उतारा. | २२.०३.२०१२ | अस्सल |
| ११. | दुय्यम निबंधक पन्हाळा येथील दस्त क्रं. १६६२/२००१ | २६.०६.२००१ | मुळ |
| १२. | अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील आर.टी.एस.दुसरे अपील क्रं. ८६८/२०१६ | २५.०९.२०१७ | स.शि.नक्कल |
| १३. | अप्पर आयुक्त पुणे यांचेकडील आर.टी.एस./रिव्ही/कोल्हापूर क्रं.२६१/२०१७ | १३.०७.२०१८ | स.शि.नक्कल |
| १४. | दुय्यम निबंधक पन्हाळा येथील खरेदी दस्त क्रं. १८३३/२०११ | ०५.०७.२०११ | स.शि.नक्कल |
| १५. | दुय्यम निबंधक पन्हाळा येथील खरेदीपत्र क्रं. २२६२/२००७ | २५.१०.२००७ | स.शि.नक्कल |
| १६. | दुय्यम निबंधक पन्हाळा येथील खरेदीपत्र क्रं. ५१/१९८७ | ०९.०१.१९८७ | स.शि.नक्कल |
| १७. | दुय्यम निबंधक पन्हाळा येथील | ०१.०८.२००३ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| | खरेदीपत्र क्रं. २०६७/२००३ | | |
| १८. | दुय्यम निबंधक पन्हाळा येथील खरेदी दस्त क्रं. १८०१/२००१ | २४.११.२००४ | स.शि.नक्कल |
| १९. | दुय्यम निबंधक पन्हाळा येथील खरेदी दस्त क्रं. २०३३/२००४ | २७.०४.२००४ | स.शि.नक्कल |
| २०. | दुय्यम निबंधक पन्हाळा यांचेकडील रजि. दस्त क्रं. १४६८/१९९३ चे खरेदीपत्र | ०५.११.२०२० | स.शि.नक्कल |
| २१. | दुय्यम निबंधक पन्हाळा यांचेकडील रजि. दस्त क्रं. १५२७/२००४ चे खरेदीपत्र | ०५.११.२०२० | स.शि.नक्कल |
| २२. | दुय्यम निबंधक पन्हाळा यांचेकडील रजि. दस्त क्रं. १२०७/२००७ चे खरेदीपत्र | ०५.११.२०२० | स.शि.नक्कल |
| २३. | दुय्यम निबंधक पन्हाळा यांचेकडील रजि. दस्त क्रं. ५१०/१९९० चे खरेदीपत्र | १०.११.२०२० | स.शि.नक्कल |
| २४. | दुय्यम निबंधक पन्हाळा यांचेकडील रजि. दस्त क्रं. १०९३/२००१ चे खरेदीपत्र | ०५.११.२०२० | स.शि.नक्कल |
| २५. | गावकामगार तलाठी मौ. कळे, | ०५.११.२०२० | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| | ता. पन्हाळा यांना दिलेला दुरुस्ती अर्ज व फेरफार | | |
| २६. | गावकामगार तलाठी मौ. कळे, ता. पन्हाळा यांना दिलेला वर्दी अर्ज व फेरफार | ०५.११.२०२० | स.शि.नक्कल |
| २७. | मौ. कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील स्थावर शेत जमिनीचे अदलाबद्दल पत्र | २३.०१.२००१ | स.शि.नक्कल |

**२५.** वादी यांनी नि.क्रं.१५६ व १५७ सोबत त्यांच्या कथना पृष्ठयर्थ मा. वरिष्ठ न्यायालयांचे खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत

1. **Mahadu Appa Wanjole Vs. Laxman Veerappa Wanjole and Ors., 2008(5) All M.R. 206**
2. **Babasaheb Raosaheb Malba Vs. Raosaheb Dattatraya Bandgar,(died), through legal representatives & Ors., 2011(4) Mh.L.J. 699**
3. **Maharwal Khewaji Turst(Regd) Faridkot Vs. Baldev Dass, 2005 AIR(SC) 104**
4. **Suresh Sopan Kadam and Ors. Vs. Jagannath Genu Kadam and Ors., 1992(2) Bom.C.R.619**
5. **Vimal Madhukar Deshmukh & Ors., Nagorao Babanrao Ghodaskar, 2008 BCI 161**
6. **Shriram Narayan Dhond & Ors. Vs. Demu Surya Gaude, 1991(4)Bom. C.R. 251**

7. <u>**Shivpalsingh Shivcharansingh Gour and Ors. Vs. Ganesh Arjunsingh Bisen, 2022(1) ALl MR 336**</u>

8. <u>**Shivpalingh Shicharansingh Gour & Anr. Vs. Ganesh Arjunsingh Bisen, 2022(1) ALL MR 336**</u>

सदर न्यायनिर्णयांचे अवलोकन करुन या अर्जाचे आदेशावेळी सदर न्यायनिर्णय विचारात घेतले आहेत.

**२६.** दोन्ही बाजुंच्या दस्तऐवजाचे अवलोकन करता वादी यांनी दाखल केलेली दस्तऐवज सोबत  विश्लेषीत केलेली छायाचित्रे ही भारतीय पुरावा कायदया अंतर्गत तरतुदीनुसार पुराव्यादरम्यान सिध्द होतील तत्पुर्वी ती प्रस्तुत अर्जासाठी विचारात घेण्यात येत नाहीत.

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>प्रश्नबिंदू क्रं.१ करीता–</u>

**२७.** वादीने सकृतदर्शनी केस तिच्या बाजूने आहे हे सिध्द करणे आवश्यक आहे. वादीने दावा मिळकतीमध्ये तिचा १/६ हिस्सा असल्याने ती प्रतिवादी सोबत सामाईकपणे वहिवाट करीत आहे असे कथन दावा पुराव्याचे शपथपत्र व नि.९८ वरील मनाई अर्जामध्ये असे कथन केले आहे. सदर वहिवाटीस प्रतिवादी यांनी दावा कलम १ मध्ये नमुद दावा मिळकतीत

प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी कोणासही तबदील करुन नये व कर्ज बोजा काढू नये याबाबत प्रतिवादी विरुध्द दावाच्या निकालपावेतो तुर्तातुर्त मनाई ताकीद मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब, वादीनी तिचा दावा मिळकतीमध्ये सामाईक वहिवाट आहे हे सिध्द करणे आवश्यक आहे.

२८. प्रथमतः वादातील बाबी नमुद करणे आवश्यक आहे. दावा मिळकत म्हणजेच गट नं. २४८ ही मुळता राघू देसाई यांची होती व वादीचे सासरे धोंडी, तुकाराम व ज्ञानू हे राघूचे वारस होते याबाबत प्रस्तुत कामात वादात आहेत. वादीचे पती रंगराव तथा प्रतिवादी क्रं. १ व २ चे वडील आनंदा व प्रतिवादी क्रं. ३ बळवंत ही मयत धोंडीची मुले आहेत ही बाब देखील वादातील आहे. दावा मिळकत ही गवती पड असून सदरची बाब ही उभय पक्षांना मान्य आहे. वादीने नि.क्रं. ३, १४, ४२, ८५, १०४, ११७, १३१, १३४, १४४,१४७ व १५१ कडे कागदोपत्री पुरावा सादर केला असून नि.क्रं. ३४ व ३५ अन्वये साक्षीदार सरदार पाटील व आनंदा वाळवेकर यांचे शपथपत्र नि.क्रं.५ च्या कामी दाखल केले आहेत. याउलट प्रतिवादी क्रं. १ व २ ने नि.४२,४४,११४, नि.क्रं.११५ वरील साक्षीदारांचे शपथपत्र नि.क्रं. १२३ कडे सादर केलेल्या कागदपत्रावर भिस्त ठेवली आहे. नि.क्रं. ६ वरील सातबारा उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा

मिळकती करीता सन २०१२–१३ साली ज्ञानू राघू देसाई यांचे वारस व तुकाराम तथा आनंदा देसाई यांची नावे समाईकरित्या नमुद आहेत. मयत राघू यांची मुले ज्ञानू आणि तुकाराम व मयत धोंडी यांचे वारस म्हणून वरील प्रमाणे नावे नमुद झाली आहेत. मयत ज्ञानू यांच्या सर्व वारसांची नांवे सातबारा पत्रकी नमुद आहेत. तुकाराम यांच्या नांवे देखील समान हिश्याची नोंद आहे. मयत धोंडी यांच्या सर्व वारसांची नांवे नमुद नसुन निव्वळ प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे वडील आनंदा यांचेच नांव सातबारा पत्रकी लागल्याचे दिसते. मयत आनंदा हे धोंडी यांचे जेष्ठ पुत्र असल्यामुळे निव्वळ त्यांच्याच नावाची नोंद एकत्र कुटुंब करता अशी झाली असे वादीचे कथन आहे. सदर कथन सातबारा–यावर मयत राघू यांच्या इतर वारसांची नांवे नोंद झाली आहेत. यावरुन प्रथमदर्शनी दिसून येते.

२९. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी दावा मिळकतीचे मयत आनंदा, रंगराव, बळवंत या भावंडामध्ये वाटप झाले व दावा मिळकत संपूर्णतः आनंदा यांच्या हिश्यास गेली असे कथन केले असले तरी त्यास पूरक कोणताही विश्वसनीय कागदोपत्री पुरावा प्रतिवादींनी अभिलेखावर सादर केलेला नाही. मयत आनंदा यांनी दावा मिळकत कालांतराने जमिनीच्या मुळ मालकांकडून योग्य त्या बाजार भावाने खरेदी घेतली त्याकरीता प्रतिवादींनी कुळ कायदा

कलम ३२–ग प्रमाणे चालेल्या प्रकरणातील काही कागदपत्रांचा आधार घेतला आहे. वादीतर्फे सादर करण्यात आलेल्या नि.क्रं.१४ अ.क्रं. २ वरील नोटीसीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अप्पर तहसिलदार यांनी ३२–ग प्रकरणी मयत धोंडी यांचे वारस म्हणून मयत आनंदा यांना नोटीस पाठवली. सदर नोटीस तुकाराम व ज्ञानू या राघू यांच्या वारसांना देखील पाठविण्यात आलेली आहे. सदर नोटीस पाठवतेवेळी धोंडी मयत असल्यामुळे त्याचे वारस म्हणून आनंदा यांना नोटीस पाठवण्यात आली आहे ही बाब स्पष्ट होते. मयत धोंडी यांचे इतर वारस हयात असून देखील आनंदा यांना नोटीस पाठवण्यात आली या मागची प्राथमिक कारणे मयत आनंदा ही मयत धोंडी यांच्या जेष्ठ पुत्र आहेत असे एंकदतरीत परिस्थीतीवरुन दिसून येते.

**३०.** नि.क्रं. १४/१ सोबत सादर करण्यात आलेल्या फेरफार क्रं. २६९१ चा उतारा पाहिला असता मिळकत क्रं. ६०२, ३६४, ४७८, ४९० व २०० आदी मिळकतीकरीता एकत्र कुटुंब पुरुष म्हणून प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे वडील आनंदा यांच्या नावाची नोंद झाली. सदर बाबीवरुन असे स्पष्ट होते की, मयत आनंदा याचे नाव मिळतींना मयत धोंडी यांचे वारस व त्यांचे कुटुंबाचे एकत्र कुटुंब कर्ता या नात्याने लागले. कुळ कायदा प्रकरणाने आलेली नोटीस व तद्नंतर चाललेले कुळ कायदा प्रकरण देखील मयत आनंदा यांनी

एकत्र कुटुंब कर्ता या नात्याने चालवली असावी असे परिस्थितीवरुन दिसून येते. दस्त यादी नि.क्रं. ४२ अ.क्रं. ७ ते ९ या कुळ कायदा प्रकरणी आलेल्या नोटीस आहेत. त्या नोटीस मध्ये देखील प्रथमतः मयत राघू यांचे वारस म्हणजेच धोंडी, तुकाराम व राघू यांना तद्नंतर मयत आनंदा यांना धोंडीचे वारस म्हणून सदर नोंदी आलेल्या आहेत.

**३१.** दावा मिळकत ही सुरुवातीपासून राघू यांच्या तिन्हीही वारसांची वडीलोपार्जीत मिळकत होती धोंडी मयत झाल्यांनतर प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे वडील म्हणजेच मयत आनंदा यांनी सदर प्रकरण एकत्र कुटुंब प्रमुख या नात्याने चालविले. त्यांच्या नावे देण्यात आलेले कुळ कायदा कलम ३२–एम अन्वयेची प्रमाणपत्र देखील मयत धोंडी यांचे वारस म्हणून देण्यात आलेले आहेत. मयत धोंडी यांना मयत आनंदा हे एकटेच वारस नव्हते. वादीचे पती रंगराव व बळवंत तसेच प्रतिवादी क्रं. ४ व ५ या मुली देखील धोंडी यांच्या वारस होत्या. कलम ३२–एम नुसार देण्यात आलेले प्रमाणपत्र हे मयत धोंडी यांचे वारस म्हणून आनंदा यांच्या नांवे देण्यात आले असल्यामुळे सदर मिळकत ही मयत आनंदा यांची स्वकष्टार्जीत मिळकत आहे असा अनुमान वर्तविणे चुकीचे आहे.

**३२.** वादीने नि.कं. ४२ सोबत दावा मिळकतीचे सन २०१२–१३ साली वादी यांनी दावा मिळकतीमध्ये गवत कापत असल्याचा फोटो तसेच दावा मिळकतीमधील गवताचा भारा बांधत असतांनाचे फोटो त्याचप्रमाणे फोटोचा रोल खरेदी केलेले बील, फोटो डेव्हलपिंग बाबत मिळालेले फोटोचे बिल, धोंडी राघू देसाई यांना कुळ कायदयाप्रमाणे दिलेली नोटीस तसेच प्रस्तुत प्रकरणातील आनंदा, धोंडी यांचा दाखला तसेच साक्षीदार आनंद शिरोळकर यांचा जबाब तसेच धोंडी राघू देसाई यांच्या नावचे प्रमाणपत्र त्यानंतर धोंडी, राघू व जमिन मालक यांच्या मध्ये कुळ नसल्याबाबतचा फेरफार क्रं. १५२६ अभिलेखावर दाखल केलेला आहे. गट नं. २८४ चा सातबारा उतारा तसेच सर्व्हे नं. ७१ चा सातबारा उतारा, तसचे सन १९५८ ते १९९५ चा उतारा अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदर सातबारा उता–याचे बारकाईने अवलोकन केले असता त्यामध्ये भोगवटदार रकान्यात ज्ञानू देसाई, तुकाराम देसाई व आनंदा देसाई यांची नांवे नमुद आहेत.

**३३.** वादीने नि.क्रं.८५ च्या वर्णन यादी सोबत कै.आक्काताई रघुनाथ पडवळ यांचे मृत्युपत्र दाखल केलेले आहे. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ नि.क्रं. १०४ च्या वर्णन यादी सोबत दस्त नं. ३८३ चे कथित खरेदीपत्र सही शिक्क्याच्या नक्कल अभिलेखावर दाखल केली असून त्यावर लिहून घेणार

म्हणून विठ्ठल पाटील, लिहून देणार म्हणून बळवंत देसाई यांची नावे नमुद असून. सदरचे खरेदीपत्र हे गट नं. २३३ मधील ० हे.०८ आर. चे असून सदर जागा ही रक्कम रुपये ४०,०००/– ने लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेली आहे. मुळात सदरचा दस्त मयत वारसांची नावाच्या नोंदी या दोन्ही बाबी वादातील असल्याने प्रस्तुतचा अर्ज निर्गत करतेवेळी त्याच्या सत्यता पडताळणे अडचणीचे आहे कारण सदर दस्ताच्या अनुषंगाने विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर येण्यासाठी अजुन बराच काळ जाणार आहे. त्याचप्रमाणे वादींनी रजिस्टर दस्त नं. १७४८, १७४९, १७५०,१७५१ तसेच ३४५ चे कथीत खरेदीपत्र व रजिस्टर दस्त नं. २२३९ चे कथित खरेदीपुर्व करारनामा दाखल केला आहे. गट नं. २३३, २३७, ६६८, ६७०, ७०७, ८९९ इ. चे सातबारे उतारे अभिलेखावर दाखल केले आहेत. सदर सातबारा उतारा व मयत राघू यांच्या इतर वारसांची देखील नोंद असल्याचे दिसून येते. त्यानंतर वादीने नि.क्रं. ११७ च्या वर्णन यादी सोबत बळवंत धोंडी देसाई यांचा दि.०४.०४.२०२० रोजी तसेच पांडूरंग तुकाराम देसाई यांचा २४.०४.२०२० रोजी मृत्यु झाल्याचे मृत्युप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्यानंतर नि.क्रं. १३१ च्या वर्णन यादी सोबत सागर पांडूरंग देसाई यांचा मृत्यु १९.०९.२०२० व दिपक पांडूरंग देसाई यांचा मृत्यु देखील

१९.०९.२०२० रोजी झाल्याबाबतचे मृत्युपत्र दाखल केलेले आहे. त्यानंतर वादीने नि.क्रं. १३४ वर्णन यादी सोबत प्रतिवादी क्रं. ५ श्रीमती शालाबाई दिनकर बचाटे यांचा दि. १७.१०.२०२१ रोजी मृत्यु झाल्याचे मृत्युप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

**३४.** त्यानंतर वादीने किर.दिवाणी अपिल क्रं. ४८/२०१५ चे दि. २५.०९.२०१९ ची मा. जिल्हा न्यायालय कोल्हापूर यांच्याकडील न्यायनिर्णयाची प्रत अभिलेखावर दाखल केली असून त्यामध्ये प्रतिवादी क्रं. १ व २ तसेच त्यांच्या वतीने इतर कोणीही व्यक्तीनी वादीचे कायदेशीर कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा आणू नये तसेच समाईक कब्जा असलेल्या मिळकतीत गवत कापणेस प्रतिबंध करुनये अशा निर्देशाने सदरचे अपिल अंशतः मंजूर करण्यात आले होते.

**३५.** त्यानंतर वादीने नि.क्रं.१४७ च्या वर्णन यादीसोबत दस्त क्रं.७५६/१९८६ चे दि.१४.०५.१९८६ रोजीचे खरेदीपत्राची छायाकिंत प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यामुळे सदर दस्त या घडीला विचारात घेता येणार नाही. त्यानंतर वादीने नि.क्रं.१५१ वर्णन यादी सोबत प्रतिवादी क्रं. ३/ब सुनिल बळवंत देसाई यांचा मृत्यु दि.२५.०१.२०२२ रोजी झाल्याचा

मृत्युपत्राची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. दावा मिळकत मयत राघू यांच्या मृत्यु पश्चात त्यांची तिन्हीही मुले यांची एकत्र अशी वडीलोपार्जीत मिळकत होती. राघूची तिन्हीही मुले मयत झाल्यानंतर ती त्यांच्या वारसामध्ये वडीलोपार्जीत मिळकत या नात्याने वहिवाटली गेली. मयत आनंदा यांच्या नावे झालेल्या नोंदी या निव्वळ एकत्र कुटुंब प्रमुख या नात्याने झाल्या.

३६. प्रतिवादीतर्फे विधीज्ञानी असा युक्तीवाद केला की, वादीच्या नांवे मयत रंगराव यांचे मिळकतीचे नामातंरण झाले आहे व त्या मिळकतीबाबत वादीने दाव्यात कांहीही नमुद केलेले नाही. नि.क्रं.४४ वर सादर करण्यात आलेल्या ८–अ चा खाते क्रंमाक ३०५ चा उतारा व खाते क्रं. ४५१ चा उतारा हा वादीचे पती रंगराव यांच्या मिळकतीबाबत आहे. या उता–याच्या आधारे प्रतिवादीतर्फे विधीज्ञानी केलेल्या युक्तीवाद तसेच सदर मिळकती या विभक्त झाल्या आहेत किंवा कसे याचा खुलासा केलेला नाही. परंतु वादीच्या नावे स्वतंत्रतः मिळकती नमुद आहेत. यावरुन वादीचे पती व दिर यांच्या दरम्यान वाटप होऊन मिळकती विभक्त झाल्या असे प्रामुख्याने दिसून येत. महसुल दप्तरी जरी वादींच्या नांवे कांही मिळकतीची नोंद असली तरी देखील सदर महसुल अभिलेख हा वादी व प्रवितादी यांचे पुर्वहक्कदारा दरम्यान वाटप

झाले होते असे सिध्द करण्यास सकृत दर्शनी पुरेसा नाही. वर नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकत ही अजुनही अविभक्त असुन प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या वडीलांच्या नांवे झालेली नोंद ही निव्वळ एकत्र कुटुंब कर्ता झाली होती असे सकृत दर्शनी कागदपत्रांचे आधारे दिसून येते.

**३७.** प्रतिवादी यांनी नि.क्रं. ११४ वर्णन यादी सोबत दुय्यम निंबधक पन्हाळा येथील दस्त क्रं. १६६२/२००१ त्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे दुसरे आर.टी.एस. अपिल क्रं. ८६८/२०१६ चा न्यायनिर्णयाची सही शिक्क्याची नक्कल प्रत दाखल केली असून त्यामध्ये रे.क.नं.२२७/२०१२ हा दावा मा.सह.दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पन्हाळा यांचे न्यायालयात हक्कज्ञापन व कायम मानाईसाठी दाखल केला होता त्यामध्ये नोंद क्रं. ३१९५ च्या आधारे दावा मिळकतीची कागदोपत्री प्रस्तुत दाव्यातील वादींच्या असलेल्या चुकीच्या नोंदी प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्रं. १ व २ वर बंधन कारक नाहीत अशी मागणी केली होती. परंतु जो पर्यंत नोंदी खोटया असल्याचे सिध्द होत नाहीत तो पर्यंत त्या ख–या असल्याचे गृहीत धरले जाणार नाही असे निर्देश नोंदवून अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी आर.टी.एस. दुसरे अपिल क्रं. ८६८/२०१६ मध्ये दि.१०.०८.२०१७ रोजी दिलेला आदेश कायम केलेला आहे.

३८. अप्पर आयुक्त पुणे यांच्याकडील आर.टी.एस रिव्हीजन क्रं. २६१/२०१७ मध्ये रिव्हीजन अर्जदार यांचा रिव्हीजन अर्ज क्रं. २६१/२०१७ हा अमान्य केला असून अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या कडील आर.टी.एस. दुसरे अपिल क्रं. ८६८/२०१६ यातील निर्णय कायम ठेवण्यात आला. त्यानंतर प्रतिवादीनी दुय्यम निबंध पन्हाळा खरेदीदस्त क्रं.१८३१/२०११, २२६२/२००६,५१/१९८७, २०६७/२००३ तसेच १८०१/२००० व २०३३/२००४ इ. खरेदीपत्र दाखल केली असून सदर खरेदीपत्र ही वादात असल्याने तसेच त्यांच्या सिध्दतेकरीता अभिलेखावर अजून पुरावा आला नसल्याने ती सद्या विचारात घेता येणार नाहीत. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी नि.क्रं. ११५ च्या वर्णन यादी सोबत सुनिल बळवंत देसाई यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी नि.क्रं.१२३ च्या वर्णन यादी सोबत दुय्यम निबंधक पन्हाळा यांच्याकडे रजिस्टर दस्त क्रं. १४६८/१९९३ चे खरेदीपत्र, १५२७/२००४ चे खरेदीपत्र, १२०७/२००७ चे खरेदीपत्र, १०९३/२००१ चे खरेदीपत्र तसेच गाव कामगार तलाठी मौजे कळे, ता.पन्हाळा यांना दिलेला दुरुस्ती अर्ज व फेरफार तसेच स्थावर शेतजमिनीची आदलाबदल पत्र अभिलेखावर दाखल केले आहेत. सदरची अदलाबदल पत्रे ही दावा मिळकतीच्या संदर्भाने

नसल्याने त्याचा प्रस्तुत अर्ज निर्गत करतेवेळी विचार करता येणार नाही.

३९. वादींची प्रतिवादी समवेत वहिवाट आहे असे वरील विश्लेषणा आधारे तसेच दाखल कागदपत्रांवरुन सकृत दर्शनी दिसून येत आहे. प्रतिवादींनी वादीच्या हक्काबाबत प्रश्न उत्पन्न केला आहे. तसेच वादीच्या वहिवाटीस प्रतिवादींनी अडथळा निर्माण केला आहे असे स्पष्ट होते. वादींना त्यांचा समाईक हक्क बचावण्यापासून जर प्रतिवादींना रोखले नहीतर निश्चितच वादीचे नुकसान होणार आहे. परिणामी वादीने मागितल्या प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुम देणे न्यायोचित होते. सबब, मुद्द क्रं.१ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते.

**<u>प्रश्नबिंदू २ व ३ करीता</u> –**

४०. वादीने प्रतिवादी विरुध्द प्रथमदर्शनी केस शाबित केली आहे. सबब, वादीच्या हक्काना दावा मिळकती संदर्भाने संरक्षीत करणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने प्रतिवादींच्या तुलनेत जास्त आहे. सबब, प्रश्नबिंदू क्रं. २ व ३ होकारार्थी नोंदवण्यात येत आहे.

**<u>प्रश्नबिंदू ४ करीता</u> –**

**४१.** प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर हे वादीच्या हक्कात नसल्याने प्रश्नबिंदू क्र. ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. दावा मिळकतीत वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्रं. १ व २ अगर त्यांचेतर्फे कोणत्याही इसमाने हरकत अडथळा करु नये, त्यावर बोजा अथवा त्रयस्थ इसमाचा हक्क निर्माण करु नये अगर दावा मिळकत अन्य मार्गाने तबदिल करु नये अशी मुळ दावेचे अंतिम निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई ताकीद देणेत येते.

३. उक्त अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालानंतर होणा–या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घेण्यात यावा.

Digitally signed by V. A. Lavand-Kokate
Date: 2024.01.19 17:48:07 +0530
V. A. Lavand-Kokate

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दि. १६.०१.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कळे–खेरीवडे.